एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड, न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701
एक वेळ अवश्य भेट द्या 8459953702

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
बीड/महाराष्ट्र ● मंगळवार ३ सप्टेंबर २०२४ ● आरएनआय-एमएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक १९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
दैनिक वादळ वार्ता
पत्रकार
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक, सोशल मीडियाचा वापर करता येणे
मो.न.9422660077

# मराठवाडा, विदर्भाला अतिवृष्टीचा फटका, जनावरे दगावली; उभी पिकं आडवी झाली, अनेक महामार्ग पाण्याखाली

## परभणीत पिकांचं मोठं नुकसान

परभणी जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून सतत झालेल्या पावसाने पिकांत मोठ्या प्रमाणावर नुकसान झालं आहे. 52 महसूल मंडळापैकी 50 महसूल मंडळात अतिवृष्टी झाली असून 2 लाख 12 हजार हेक्टर क्षेत्रावर नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सोयाबीन, कापूस, मूग, हळद आदी अनेक पिकांचे नुकसान झाले असून हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जिल्ह्यात सरासरी दोन दिवसात 132 मिलिमीटर इतका पाऊस झाला, या मुसळधार पावसाने वार्षिक सरासरीचा टप्पा पार केला. 1 जून पासून आज पर्यंत 664 मिलिमीटर इतका पाऊस झाला तर वार्षिक सरासरी 615 मिलिमीटर इतकी आहे. काल संध्याकाळपासून पाऊस थांबला असला तरी ढगाळ वातावरण कायम आहे.



गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरु असून या पावसाने मराठवाड्यातील अनेक भागांना अक्षरश: झोडपलं आहे. परभणी, नांदेड, हिंगोली या जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस झाला असून पावसाचा फटका बसल्याने जनजीवन अतिशय विस्कळीत झालं आहे. नदी-नाल्यांना पूर आला असून अनेक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. पावसामुळे घर, मालमत्ता शेतीचंही मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असून अनेक ठिकाणी महामार्ग ही पाण्यात गेले आहे. काही ठिकाणी पाण्यामुळे उभी पिकं आडवी झाली आहेत तर काही ठिकाणी पाण्यात अनेक जनावरंही वाहून गेल्याची माहिती समोर आली आहे.छत्रपती संभाजीनगर शहरात गेल्या २४ तासांत ७१ मिलिमीटर पाऊस झाला. बीड, लातूर, धाराशिव, जालना जिल्ह्यांनाही पावसाचे झोडपून काढले. नांदेड जिल्ह्यालाही पावसाने झोडपलं असून अतिवृष्टीमुळे 2 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र बाधित आहे. जिल्ह्यातील 45 मंडळामध्ये अतिवृष्टी झाली. कालपासून पावसाने विश्रांती घेतल्यामुळे नागरिकांना दिलासा मिळाला होता. मात्र आज पुन्हा पावसाने हजेरी लावल्याने नांदेडमधील आसना नदीला पूर आला असून धोकादायक परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे. खरीप हंगाम पाण्यात गेल्याने शासनाने तात्काळ मदत करावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. दरम्यान छ. संभाजीनगरमध्ये एक बाईकस्वार आणि त्याची मोटारसायकल असे दोघेही वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील खुलताबाद तालुक्यात हा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. धाड नदीला आलेल्या पुरात मोटरसायकल सह मोटार सायकलचालक वाहून गेला. मोटार सायकल वाचवण्याच्या प्रयत्नात चालकही वाहून गेला, ही धक्कादायक घटना मोबाईल मध्ये कैद झाली. त्यामुळे एकच गोंधळ माजला.



# चालक वाहक यांचा प्रामाणिकपणा प्रवाशाचा सापडलेला मोबाईल केला परत

**सोलापूर । विश्वास चोपडे**

दिनांक-३१/०८/२०२४ रोजी अकलूज अक्कलकोट अकलूज मार्गावर प्रवास करताना पांडुरंग ज्ञानू मिसाळ, रा.कोल्हापूर या प्रवाशाचा स्मार्टफोन ( मोबाईल ) हारविला होता. तो मोबाईल कर्तव्यावरील चालक श्री. अतुल पोपट काटे चालक क्र.४६५ व वाहक श्री. सुरेश लक्ष्मण कुचेकर वाहक क्र.९४११० यांना मिळाला असता त्यांनी अक्कलकोट येथील कर्तव्यावरील वाहतूक नियंत्रक यांच्याशी संपर्क करून त्यांचे समक्ष प्रवाशी श्री पांडुरंग मिसाळ यांना परत केला.त्यामुळे पुन्हा एकदा रा.प. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा प्रामाणिकपणा दिसून आला. सदर मोबाईल परत घेत असताना श्री पांडुरंग मिसाळ यांनी चालक श्री काटे व वाहक श्री कुचेकर यांचे आभार मानून त्यांना ५००/- रुपयांचे बक्षीस देऊ केले असता चालक वाहक यांनी त्यांस नम्रपणे नकार देऊन त्याच रकमेतून गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्याचे श्री पांडुरंग मिसाळ यांना आवाहन केले.

श्री पांडुरंग मिसाळ यांनी रा. प. महामंडळ व कर्मचाऱ्यांचे शतशः आभार व्यक्त केले.

# राज्यातील महिलांसाठी हर घर दुर्गा अभियान

## लवकरच सुरू होणार, राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता मंत्री मंगलप्रभात लोढा यांचे वक्तव्य

**नाशिक । सुरेश इंगळे.**

सध्या महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे वाढते प्रमाण लक्षात घेता, राज्यातील प्रत्येक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये “हर घर दुर्गा अभियान” राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योगमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले.

राजमाता जिजाऊ आणि पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर आदींचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्रातील घरोघरी अन्यायाविरुद्ध लढणारी दुर्गा तयार व्हावी या उद्देशाने हर घर दुर्गा अभियान सुरू करण्यात येणार आहे. ज्याप्रमाणे शाळा आणि महाविद्यालयांमध्ये शारीरिक शिक्षणाचा तास घेतल्या जातो, त्याप्रमाणे मुलींसाठी atma आत्मसुरक्षा प्रशिक्षणासाठी राखीव ताशिका असावी यासाठी राज्याचे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी पुढाकार घेतला आहे . शारीरिक शिक्षणाप्रमाणेच वर्षभर महिलांसाठी कराटे, जुडो यासारख्या संरक्षणाच्या पायाभूत प्रशिक्षणाच्या आठवड्यातून कमीत कमी दोन तासिका घेण्यात येणार आहेत, त्याद्वारे आपत्कालीन आणि आव्हानात्मक परिस्थितीत सक्षमपणे लढण्याची ताकद महिलांना यावी त्याकरिता हे प्रशिक्षण देण्यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य सुद्धा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थिनींना नियमित सरावासाठी अध्दयुक्त करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## शेतकऱ्यांनी पीक नुकसानीच्या तक्रारी क्रॉप इंन्शुरन्स ॲप वर तात्काळ नोंदवाव्यात-प्रा.ईश्वर मुंडे



किल्ले धारूर ।प्रतिनिधी मागील तीन दिवसापासून राज्यासह बीड जिल्हयात संततधार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पीके अतिवृष्टीने गेलेली आहेत.

या नुकसानीचे पंचनामे महसूल यंत्रणेमार्फत होतीलच परंतू पीक वीमा कंपनीच्या अटी नुसार चोवीस तासांच्या आत या नुकसानीची तक्रार फोटोसह क्रॉप इंन्शुरन्स ॲप वर करणे आवश्यक आहे.

तरी सर्व शेतकरी बांधवांनी आपल्या तक्रारी सदरील ॲप वर नोंदवाव्यात असे अवाहन राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे सेवा निवृत्त अधिकारी कर्मचारी सेल चे राज्य प्रमुख प्रा. ईश्वर आनंदराव मुंडे यांनी केले आहे. या बाबतच्या अडचणी व अधीक माहीतीसाठी ९०९६६८८३६५ या क्रमांकावर संपर्क साधावा.

# अंकुश नगर परिसरातील करपरा नदीपात्रात पुरुष जातीचा मृतदेह सापडला, शहरात खळबळ

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात दोन दिवसापासून पावसाने दमदार हजेरी लावल्याने ओढे, नदी, तलाव ओसंडून वाहत आहेत. ३१ ऑगस्ट रोजी रात्री सुरुवात झालेला मध्यम पाऊस दिवसभर पडल्याने रविवारी बीड शहराजवळ बिंदुसरा तलाव १००% भरला असल्याने पूर परिस्थिती निर्माण झाली. अंकुश नगर भागातील करपरा नदी देखील ओसंडून वाहत आहे, आज दिनाक 2 सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास या भागातील नागरिक करपरा नदी कडे पाणी पाहण्यासाठी गेले असता त्यांना पाण्यात एक पुरुष जातीचा मृतदेह वाहून आलेला दिसल्याने तत्काळ नागरिकांनी शिवाजीनगर पोलिसांना याच माहिती दिली. असता तत्काळ पोलिसांनी अंकुश नगर भागातील नदीमध्ये घटनास्थळी दाखल होऊन आज दिवस पाण्याबाहेर काढला व मृतदेहाची ओळख पटवण्याचे काम पोलीस करत आहेत. हा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आला आहे.



# जिल्ह्यातील अनेकांना पडू लागले आमदारकीचे स्वप्न

अंबाजोगाई । परवेज पटेल
महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासुन फुटाफुटीचे राजकारण झाले, एकाच पक्षाचे दोन पक्ष तयार झाल्याने विधानसभा निवडणूक असो वा लोकसभा निवडणूक असो इच्छुक उमेदवारांची संख्याही वाढली. त्यामुळे प्रत्येक विधानसभा मतदार संघात अनेकांना आमदारकीचे स्वप्न पडत आहेत महाराष्ट्राच्या राजकारणात गेल्या काही दिवसांपासुन बराच बदल झाल्याने सर्वसामान्य मतदार एका पक्षाला निवडून देतात्तव व दुसराच पक्ष सचेत बसतो, त्यामुळे सर्वसामान्य मतदारही गोंधळात पडलेला आहे. परिणामी त्यांच्यापुढे मतदान करावे की नाही अरण प्रश्न भेडसावत आहे. आता लवकरच होणारा विधानसभा निवडणूकीसाठी इच्छुकांची जोरदार तयारी असून इच्छुक उमेदवार मतदार संघात फिरताना दिसत आहेत. प्रत्येक निवडणूक तोंडावर आली की, अनेक छोटे-मोठे पुढारी मठदारांच्या गाठी भेटीसाठी फेरफटका मारत असताना दिसत आहेत विकासाच्या प्रश्नावर न्यायाची भाषा केली जाते. प्रत्येक्षात मात्र मतदारांना कितपत न्याय मिळतो. याचा अंदाज कोणीच घेत




नाही. ही परिस्थिती लक्षात घेवून इच्छुक उमेदवार निवडणूक लढण्याच्या तयारीत आहेत. सर्वसामान्य मतदारांना आपण न्याय देवू त्यासाठी आपण काम करू अशी ग्वाही इच्छुक उमेदवाराकडून दिली जाते अनेक सरकारे आली मात्र सामान्य मतदारांच्या प्रश्नांना न्याय मिळाला नाही, उलट फुटाफुटीचे राजकारण करून आपली पोळी भाजणार्या पुढाऱ्यांना मतदार कंटाळले असून नवी दिशा देणारी तरूणांची फळी निवडणूकीच्या मैदानात उत्तरली तर खऱ्या अर्थाने सामान्यांना न्याय मिळेल व सध्याचे गोंधळाचे राजकारण संपुष्ठात येईल अशी अपेक्षा इच्छुक उमेदवारांनी व्यक्त केली असून त्यासाठी आपण काम करू व मतदार आपल्या पाठीशी राहतील अशा विश्वास व्यक्त करत इच्छुक उमेदवार आतापासुनच मतदराच्या गाठी-भेठी घेण्यासाठी सरसावत आहेत

## केअर ऑफ नेचर संस्थेचे रुपेश पाटील यांनी वाचविले तिबोटी खंडया पक्षाचे प्राण.

### तिबोटी खंडया रायगड जिल्ह्याचा जिल्हा पक्षी म्हणून परिचित.

### रुपेश पाटील यांच्या कार्याचे सर्वत्र कौतुक.

उरण । विठ्ठल ममताबादे
रविवार दिनांक १ सप्टेंबर २०२४ रोजी पनवेल मधील करंजाडे येथे कॉलेज फाट्याजवळ असलेल्या तलावात पडलेला 'तिबोटी खंड्या' नावाचा पक्षी आढळून आला. याला इंग्रजीत 'ओरिएंटल ड्वार्फ किंगफिशर' (ODKF) म्हणतात. 'केअर ऑफ नेचर' या निसर्ग सेवी संस्थेचे चिंचपाडा शाखा अध्यक्ष रुपेश पाटील हे सकाळी पोहण्यासाठी तलावात गेले असता आपला जीव वाचविण्यासाठी पाण्यातून बाहेर पडण्याकरिता हालचाली करत असलेला हा असहाय पक्षी त्यांच्या नजरेस पडला. त्यांनी या पक्षाला पाण्यातून



काढून लगेचच 'केअर ऑफ नेचर महाराष्ट्र राज्य'चे संस्थापक राजू मुंबईकर यांना संपर्क करून ही माहिती दिली. व त्यांच्या मार्गदर्शनाखाली योग्य ते उपचार करून पक्षी सुस्थितीत झाल्यावर त्याला त्याच ठिकाणी त्यांच्या निसर्ग अधिवासात मुक्त केले.

पश्चिम घाटात रहिवासी असलेला हा 'तिबोटी खंड्या' विणीच्या हंगामात रायगड जिल्ह्यात आलेला पाहायला मिळतो. 'तिबोटी खंड्या' या पक्षाला रायगड जिल्ह्याचा 'जिल्हा पक्षी' म्हणून घोषित करण्यात आलेले आहे. विविध रंगाचे अतिशय विलोभनीय असं सौंदर्य प्राप्त असलेला 'तिबोटी खंड्या' दरवर्षी जून ते सप्टेंबर या त्याच्या विणीच्या काळात मोठ्या प्रमाणात कोकणात घरटी करताना पाहायला मिळतो. ह्याच्या निरिक्षणासाठी कर्नाळा अभयारण्य हे पक्षी प्रेमींचे सर्वात पसतींच्या ठिकाणांपैकी एक महत्त्वाचे ठिकाण मानले जाते. आपल्या पिल्लांना भरविण्यासाठी जंगलातून पाली, लहान खेकडे, बेडूक इ. घेऊन येतानाच क्षण अगदी अनुभव घेण्यासारखे असतात. आणि विणीच्या अशावेळी या पौढ पक्षाला मिळालेलं हे जीवदान खूप महत्त्वाचे मानले जातेय.

## आमदार सतीश चव्हाण यांना उत्कृष्ट संसद पटू पुरस्कार



छ. संभाजीनगर । प्रा संजय तुपे
राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे सन२०१९-२० करिता महाराष्ट्र विधान परिषद उत्कृष्ट संसद पटू पुरस्कारासाठी मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण यांची निवड झाली आहे महाराष्ट्र विधान मंडळाची पिठासीन अधिकारी यांनी दिलेल्या निर्देशानुसार राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधान मंडळाच्या सदस्यांची सन २०१८-१९,२०१९-२०,२०२१-२२,२०२२-२३,२०२३-२४, या कालावधीसाठी देण्यात येणाऱ्या उत्कृष्ट संसद फोटो व उत्कृष्ट भाषण या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे यामध्ये आमदार सतीश चव्हाण यांची सन २०१९-२० करिता महाराष्ट्र विधान परिषद उत्कृष्ट संसद पटू म्हणून निवड करण्यात आली आहे असे महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयाचे सचिव राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेचे सचिव जितेंद्र भोळे यांनी पत्राद्वारे कळविले आहे ३ सप्टेंबर रोजी राष्ट्रपती द्रोपदी मुरमु यांच्या हस्ते विधान भवन मुंबई येथे हे पुरस्कार वितरण होणार आहे,



## घोंगडी बैठकी ला लाखोंच्या संखेने उपस्थित रहा - सकल मराठा समाज माजलगाव

**माजलगाव प्रतिनिधी:-**

संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रभर घोंगडी बैठकीचा आयोजन, या निमित्त 6 सप्टेंबर 2024 रोजी माजलगाव मतदार संघ तेलगाव जिजाऊ मंगल कार्यालय या ठिकाणी सकाळी साडेअकरा वाजता या घोंगडी बैठकीचा आयोजन केलेआहे. या घोंगडी बैठकीच्या आयोजनानिमित्त सकल मराठा समाजाचे सामाजिक काम करणारे कार्यकर्ते माजलगाव तालुक्यात प्रत्येक गावगाड्यात फिरवून सव्वा लाख ते दीड लाख मराठा बांधवांनी आणि शेतकरी बांधवांनी जरांगे पाटील यांच्या घोंगडी बैठकीला उपस्थित राहण्याचे आवाहन करीत आहेत. तसेच जरांगे पाटील यांनी मराठा आरक्षण तसेच शेतकरी कर्जमाफी हे महत्त्वाचे मुद्दे घेतले असल्याकारणाने महाराष्ट्रातला शेतकरी जरांगे पाटील यांच्या पाठीशी भक्कमपणे उभा राहील असे दिसून येत आहे येणाऱ्या विधानसभा या विधानसभेमध्ये सर्वसामान्य शेतकऱ्यांची पोरं या विधानसभावनामध्ये पाठवायची की नाही निवडणूक लढवायची की नाही हा निर्णय या घोंगडी बैठकीच्या माध्यमातून होणार असून, अनेक मराठा बांधवांना कुणबी प्रमाणपत्र मिळाले अजूनही बरेचसे मराठा बांधव कुणबी प्रमाणपत्रापासून वंचित आहेत . जोपर्यंत शेवटच्या मराठा बांधवांच्या घरात कुणबी प्रमाणपत्र जाणार नाही तोपर्यंत हा लढा सुरूच राहील असे जरांगे पाटील म्हणतात. माजलगाव मतदार संघाची 6 सप्टेंबर रोजी ची घोंगडी बैठक ना भूतो ना भविष्य अशी घोंगडी बैठक होणार असून लाखोंच्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सकल मराठा समाज माजलगाव यांच्या वतीने करण्यात येत आहे

## वंचित बहुजन आघाडीच्या वतीने महाराष्ट्रातील महिला अत्याचार प्रकरणी निदर्शने ब्रह्मपुरी येथे तहसीलदारांना वंचित बहुजन आघाडीच्या महिलांचे निवेदन

ब्रह्मपुरी । प्रतिनिधी
महाराष्ट्रासह देशातील महिला व मुली यांच्यावर होणाऱ्या अत्याचार, बलात्कार निषेधार्थ वंचित बहुजन महिला आघाडी च्या जिल्हा उपाध्यक्षां लिंना रामटेके यांच्या मार्गदर्शाना खाली जाहिर निषेध नोंदवत तहसिलदार यांना दिले निवेदन तहसील कार्यालय ब्रम्हपुरी येथे वंचित बहुजन महीला आघाडी तर्फे मुख्यमंत्री, गृहमंत्री यांना तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी ब्रह्मपुरी यांच्या मार्फत निवेदन सादर करण्यात आले.व महीलांनवरील अन्याय व अत्याचाराचा निषेध नोंदवीण्यात आला. सध्या देशामध्ये व महाराष्ट्रात महीलांनवर होणारे वाढत्या बलात्काराचे व अत्याचाराचे प्रमाण वाढलेआहेत.राज्यातील कायदा सुव्यवस्था अंतीम घटका मोजत आहेत. गुन्हेगारांना कुठल्याही प्रकारचा वचक राहीलेला नाही.गुन्हेगारांना फाशी ची शिक्षा झालीच पाहीजे.आजची स्त्री ही स्वावलंबी आहे पण सुरक्षित नाही.स्त्री ही शिक्षणाकडे वळली.शिक्षण घेत यशाचे ध्येय गाठत गेली.ती उंच झेप घेण्यापूर्वीच काही वासनाधीन विकृती,नराधम तीचे पंख छाटायला तयार असतात. स्त्री ला स्वातंत्र्य मिळाले पण कुठे? बलात्काराची शिकार होऊन कित्येकांना आपला जीव गमवावा लागतो. हॉस्पीटल मध्ये बलात्कार,शाळेत बलात्कार, मंदिरात बलात्कार मुली/महीला नक्की कुठे सुरक्षित आहेत?"कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा"?लहान मुले मुलींना खाऊचे आम्हीच दाखवून त्यांच्यावर दोन दोन तीन तीन उच्चशिक्षित लोक सुद्धा बलात्कार करीत असताना दिसत आहेत शिक्षक विद्यार्थीनीवर लैंगिक अत्याचार करतांनी दररोज वर्तमानपत्रातुन दिसू




लागली आहे.महीलांना सुरक्षा द्या मुख्यमंत्री साहेब, तुमची लाडकी बहीण व तीची लेक सुरक्षित नाहीत महाराष्ट्रात अराजकता पसरलेली आहे. एकीकडे म्हणता "बेटी बचाव, बेटी पढाव"आणि जिकडे पहावा तिकडे मुली लैंगिक अत्याचाराचे बळी पडत आहेत ही बाब खरंच निंदनीय आहे या गंभीर बाबीची दखल घेऊन सरकारने लवकर ठोस पावले उचलावी अशी मागणी करण्यात येत आहे घरच्या प्रमुखांना पत्नी व मुलगी घराबाहेर पडली ती सुरक्षित घरी वापस येईलच याची चिंता सतावू लागली आहे. महीलांना व मुलींना सुरक्षा जर मिळाली नाही तर वंचित बहुजन महीला आघाडी ब्रह्मपुरी रस्त्यावर उतरून आंदोलन करेल असा इशारा वंचित बहुजन महीला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्षा लिना रामटेके यांनी यावेळी दिला.निवेदन देतांना लता मेश्राम, चंदा माटे,प्रतिमा डांगे,करुणा मेश्राम. वंदना कांबळे,प्रिया हरडे, विजया खोब्रागडे,निरू खोब्रागडे, योगिता रामटेके,सुकेशनी चौधरी,शिला बनकर व इतर महिला कार्यकर्त् उपस्थित होत्या.

## राणी उंचेगांव-रांजणी मार्गावरील अंतरवाली दाईचा पुल गेला वाहून

जालना । असलम कुरेशी
घनसावंगी विधानसभा मतदार संघातील अंबड-राणी उंचेगांव-रांजणी मार्गावरील मौजे अंतरवाली दाई येथील पुल अतिवृष्टीने वाहून गेल्याने करडगांव, करडगांववाडी, भुतेगांव, रांजणी आदी गावांचा दळणवळणाचा संपर्क तुटला असून या पुलाची तात्काळ दुरुस्ती करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. रविवारी रात्री अंबड व घनसावंगी तालुक्यात मोठ्या प्रमाणात मूसळधार पाऊस झाला. या अतिवृष्टीत अंबड, राणी उंचेगांव व रांजणी रोडवरील अंतरवाली दाई येथील पुल वाहून गेल्याने करडगांव, करडगांववाडी, भुतेगांव, रांजणी आदी गावांचा दळणवळणाचा संपर्क तुटला आहे. या पुलाची माजी आरोग्य मंत्री राजेशभैय्या टोपे यांनी पाहणी करून अधिकाऱ्यांना पुलाचा पंचनामा करून सदरील पुलाचे तात्काळ बांधकाम करण्याच्या सूचना दिल्या.



## आमदार साहेब, नरकयातना संपणार कधी?? स्मशानभूमीचे काम दिडवर्षापासुन रखडल्याने पावसात अंत्यविधी करण्याची नामुष्की :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:- बीड तालुक्यातील जिल्हा परिषद सर्कलचे गाव म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम आ.संदिप क्षीरसागर यांच्या कार्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे रखडलेले असुन पावसात अंत्यसंस्कार करावे लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये तिव्र नाराजी असुन " सरण रचुन ठिय्या"आंदोलन केल्यानंतर आ.संदिप क्षीरसागर यांनी दिड वर्षांपूर्वी स्मशानभूमीसाठी मंजुर केलेल्या ८ लक्ष रुपयांच्या निधीतून अद्याप काम पूर्ण का नाही?? त्यामुळे आमदार संदीप क्षीरसागर साहेब नरकयातना संपणार कधी?? आणि लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम पूर्ण होणार कधी?? असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी विचारला आहे. लिंबागणेश येथील २० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था असुन पत्रे उडुन गेलेले, बांधकाम ढासळलेल्या अवस्थेत असल्याने नविन स्मशानभूमी बांधकामासाठी निधी देण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी स्मशानभूमीत सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते. याची दखल आ.संदिप क्षीरसागर यांनी घेत जिल्हा वार्षिक (दहन/दहनभुमी) जन सुविधा विशेष अनुदान योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षाकरीता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत दि.३१ मार्च २०२३ रोजी प्रशासकीय मान्यता दिली होती.मात्र आमदार साहेबांच्या कार्यकर्त्यांच्या हलगर्जीपणामुळे स्मशानभूमीचे काम रखडलेले असुन काल सायंकाळी अल्पशा आजाराने मयत झालेल्या कै.केशरबाई




तुळशीराम नाईकवाडे यांचा अंत्यविधी आज दि.१ सप्टेंबर रोजी सकाळी भर पावसात करावा लागला. यावेळी पावसामुळे तारांबळ उडाली असून ग्रामस्थांनी रखडलेल्या स्मशानभूमीच्या कामामुळे पावसात अंत्यसंस्कार करण्याची नामुष्की आल्याने तिव्र नाराजी व्यक्त केली. स्मशानभूमीची दुरावस्था,मृतदेहाची हेळसांड, लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला गांभीर्य नाही:- डॉ.गणेश ढवळे

बीड जिल्ह्यातील १३९४ पैकी ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोय नसल्याने पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड होत आहे.तर आस्तित्वात असलेल्या स्मशानभूमीची दुरावस्था असुन ढासळलेले बांधकाम, उडुन गेलेले पत्रे तर काही ठिकाणी काटेरी झुडुपातुन वाट काढत दहन शेडकडे जावे लागते. काही गावांमध्ये स्मशानभूमीसाठी जागा नसल्याने अंत्यसंस्कार रोखण्यात आल्याच्या घटना घडलेल्या आहेत. त्यातुन वादविवाद निर्माण होतात, सामाजिक स्वास्थ्य बिघडते मात्र याचे लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला गांभीर्य दिसून येत नाही.वारंवार निवेदने तसेच आंदोलनानंतर सुद्धा प्रशासनाला जाग येत नाही हि दुर्दैवी बाब आहे.

# श्रद्धा,शील,दान व प्रज्ञेशिवाय कोणीही उपासक होऊ शकत नाही–भिक्खू धम्मशील थेरो

बीड । प्रतिनिधी धम्मात सफलता प्राप्त करण्यासाठी सद् गुणाची आवश्यकता असते, त्यासाठी उपासकांना चार सद्गुण आवश्यक असतात. ते म्हणजे श्रद्धा, शील, दान आणि प्रज्ञा. प्रज्ञा म्हणजे शहाणपण, ते म्हणजे सत्य असत्यातील फरक जाणने, अनित्य, अनात्म, दु:खाचा बोध होणे तसेच आर्य अष्टांगिक मार्गाचा अवलंब करणे होय. श्रद्धेला शहाणपणाची म्हणजेच प्रज्ञेची जोड हवी असते.

उपासकाने दान कुणास द्यावे, कसे द्यावे यासाठी प्रज्ञेची गरज असते. प्रज्ञा तीन प्रकारची असते १) इतरांचे ऐकून मिळते ती "श्रुतमय प्रज्ञा'२) चिंतनातून मिळते ती "चिंतनमय प्रज्ञा' ३) प्रत्यक्ष अनुभवातून मिळते ती "भावनामय प्रज्ञा"पण मनुष्याला प्रज्ञा ही प्रत्यक्ष अनुभवातूनच येते. उपासकाला दान देताना सहा गोष्टीचे स्मरण हवे. १)श्रद्धायुक्त



अंत:करणातून दान द्यावे. २)दान विधीपूर्वक द्यावे दोन्ही हाताने गुडघ्यावर बसून विनम्रतेने निस्वार्थपणे परतफेडीची अपेक्षा न करता द्यावे.३)एकाग्रचित्ताने जागृतीपूर्वक दान द्यावे. ४)द्वेषभावना विरहित मैत्रीयुक्त चित्ताने दान द्यावे.५)अहंकार विरहित दान द्यावे.६) लोभविरहित भावनेने, निरपेक्ष भावनेने दान द्यावे. या चारही सद् गुणा शिवाय मनुष्याला सुख नाही निर्वाण नाही तसेच जीवन सार्थकी लागत नाही. श्रद्धा, शील, दान, व प्रज्ञेशिवाय खरा उपासक होऊ शकत नाही. असे प्रतिपादन पू.भिक्खू धम्मशील थेरो यांनी श्रावस्ती बुद्ध विहार माजलगाव येथे केले. यावेळी पू.भिक्खू धम्मशील थेरो हे उपासकाचे चार सद् गुण या विषयावर बोलत होते. यावेळी रणजीत घनघाव व अनुपमा रणजीत घनघाव यांनी खिरदान दिले. यावेळी प्रस्ताविक सदधम्म सेवा संघाचे जी एन घनघाव यांनी केले तर, सूत्रसंचालन ॲड.दशरथ मकसरे, यांनी केले.तर आभार सदाशिव भालेराव यांनी मानले. यावेळी संस्थेचे पांडुरंग जाधव, एन.जी.शिनगारे, सोपानराव उजगरे, भगवानराव सातपुते, रविकांत उघडे, लिलाबाई उजगरे, धम्मपाल जावळे,विजय होळकट्टी हे उपस्थित होते. हिंगोली येथील शकुंतलाताई भूक्तार, पार्वतीताई श्रीखंडे, माजी प.स.सभापती संजीवनी पौळ, प्रकाश सोनकांबळे,भारत घनगाव, प्रतिभा वाघमारे,बन्सी शिरसट,तात्यासाहेब साळवे, वंदनाताई भालेराव,नितीन डोंगरे आदी. उपासक उपस्थित होते.

# बीड जिल्ह्यात जोरदार पाऊस, नागरिकांनी सतर्कता बाळगावी खा. बजरंग सोनवणे यांचे जनतेला आवाहन

**बीड/प्रतिनिधी** बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या काठावरील पूर रेषेच्या आत आणि आसपास राहणाऱ्या रहिवाशांनी विशेष सावधानता बाळगावी. पावसाच्या तीव्रतेमुळे नदीच्या पाण्याची पातळी अचानक वाढू शकते, ज्यामुळे पूराचा धोका संभवतो. आपली आणि आपल्या कुटुंबाची सुरक्षा सुनिश्चित करण्यासाठी, आवश्यक असल्यास त्वरित सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे. प्रशासनाच्या सूचना सतत ऐकत राहा आणि परिस्थितीचा आढावा घेत राहा. असे आवाहन खा. बजरंग सोनवणे यांनी केले आहे. बीड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून पावसाचा जोर वाढला आहे.त्यामुळे नदी,नाले, ओढे, गोदावरी पात्र, लघु,मध्यम प्रकल्प



भागात राहणाऱ्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी, बीड जिल्ह्यात रेड अलर्ट जारी असल्याने, जनजीवन विस्कळीत झालं आहे. त्यामुळे प्रशासनाशी संपर्क ठेवणे अत्यंत आवश्यक आहे, जेणेकरून कोणत्याही आपत्कालीन स्थितीत त्वरित मदत मिळू शकेल. तसेच परळी-बीड हायवेवरील पांगरी (वाण नदी) येथील पर्यायी पूल पावसामुळे पाण्याखाली गेला आहे. परिस्थिती गंभीर असून, पूल कधीही वाहून जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे, परळीवरून बीड आणि बीडवरून परळीला जाणाऱ्या वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. आपल्या सहकार्याने दुर्घटना टाळता येऊ शकते.शेतकरी बांधवांनी आपल्या पशुधनाची विशेष काळजी घ्यावी, कारण हवामानाची अस्थिरता पशुधनासाठी हानिकारक ठरू शकते. तसेच, अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानामुळे खरीप पिकांची हानी झाली असल्यास, संबंधित शेतकऱ्यांनी तात्काळ आपल्या पिकांच्या नुकसानीची माहिती विमा कंपनीला कळवावी. योग्य वेळी सूचना दिल्यास नुकसान भरपाई मिळण्यास मदत होईल. आपल्या हक्कांच्या संरक्षणासाठी हे पाऊल महत्त्वाचे आहे.असे आवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी केलं आहे.

## बिंदुसरा नदीपात्रातील व नदीकाठावरील नागरिकांनी सतर्कता



बाळगावी जिल्हा प्रशासनातर्फे आवाहन

बीड, दि.1: बिंदुसरा धरण व खटकाळी धरण पूर्ण क्षमतेने भरले आहे. धरण सांडव्या वरुन मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू असून प्रकल्पातून नदीपात्रात जवळपास 400 क्यूसेक्स पाणी नदी पात्रात येत आहे. आज रविवारी (1 सप्टेंबर) रात्रीला मोठा पाऊस झाल्यास बिंदुसरा नदीपात्रात पाणी वाढ होऊ शकते. त्यामुळे नदीपात्रातील व नदीकाठावरील सर्व नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनातर्फे करण्यात येत आहे.

# पावसाचा जोर कमी होताच शेती पिकांचे पंचनामे करण्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांचे निर्देश

## शेती पिकांच्या नुकसानीची माहिती शेतकऱ्यांनी विमा कंपनीस विहित मर्यादेत कळवावी - मुंडेंचे आवा-

## बीड जिल्ह्यातील नदी काठच्या गावांनी सतर्क राहावे, नागरिकांनी धोक्याच्या ठिकाणी जाणे टाळावे, रात्रीतून काही नद्या धोक्याची पातळी ओलांडण्याची शक्यता - धनंजय मुंडे यांचे जनतेला आवाहन

मुंबई (दि. 01) - संपूर्ण बीड जिल्ह्यात 31 ऑगस्ट च्या सायंकाळपासून ते आतापर्यंत सातत्याने सर्व दूर पाऊस पडत असून जिल्ह्यातील जवळपास सर्वच जलाशय कुटुंब भरून नदीला आले खळखळून वाहू लागले आहेत. जिल्ह्यावरील जलसंकट दूर झाल्याची बातमी जरी आनंददायक असली तरी सततच्या पावसाने अतिवृष्टीचा धोका निर्माण झाला असून त्यामुळे खरीप हंगामातील शेती पिके धोक्यात येण्याची शक्यता आहे. तर काही महसूल मंडळांमध्ये 24 तासांमध्ये अतिवृष्टीच्या निकषांप्रमाणे किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस पडला असून, राज्य शासनाच्या महसूल विभागाने यापूर्वीच काढलेल्या आदेशाला अनुसरून महसूल व कृषी विभागाने पावसाचा जोर कमी होताच शेती पिकांच्या तसेच घरांच्या पडझडीच्या आदी नुकसानीचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत व शेती पिकांच्या 33% च्या मर्यादेपेक्षा जास्त नुकसानीचे अहवाल राज्य शासनाकडे मदतीच्या मागणीसह तातडीने पाठवावेत असे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप हंगामात एक रुपयात पिक विमा योजनेत सहभाग घेतला असून आपल्या शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीची माहिती विमा कंपनीच्या नियमानुसार विमा कंपनीला देखील निर्धारित वेळेत कळवावी, जेणेकरून बाधित शेतकऱ्यांना पीक विम्याचे ही संरक्षण लागू राहील असेही आवाहन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. दरम्यान सध्या जिल्ह्यात सर्वदूर सुरू असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील जवळपास सर्वच लहान मोठे जलाशय पूर्ण क्षमतेने भरले असून त्याउपर नद्यांमधून व नाल्यांमधून



पाणी वाहत आहे. पावसाचा जोर आणखी पुढील 24 तास जर इतकाच प्रखर राहिला तर काही नद्या धोक्याची पातळी ओलांडू शकतात व त्यामुळे नदीकाठच्या गावांना किंवा नदीकाठच्या शहर वस्त्यांना देखील याचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे विशेष करून जलाशय व नदीकाठच्या गावच्या नागरिकांनी सतर्क रहावे या आवाहनासह नदीच्या पूर नियंत्रण रेषेच्या क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांचे इतरत्र स्थलांतर करण्यात यावे अशा पद्धतीच्या सूचना देखील धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत.

# शिवपाठ सोहळ्यानिमित्त महाआरती प्रसाद

नायगांव । हानुमंत चंदनकर नांदेडच्या नायगांव तालुक्यातील बालाजी नगर नरसी येथे गेल्या अकरा वर्षापासून श्रावणमासा निमित्त अखंड चालत असलेल्या शिवपाठ या वर्षी शिवभक्त श्री शिवराज सिध्दपा पाटील बामणीकर यांच्या येथे चालत असलेल्या शिवपाठ सोहळ्यानिमित्त आज दिनांक ३१ ऑगस्ट रोजी सायंकाळी ठिक ८ वा संपन्न झाली आरतीचे यजमान श्री शिवभक्त योगेश चौधरी व त्यांच्या पत्नी सौ यांच्या वतीने महारूद्र अभिषेक पुजा आरती करण्यात आली व रात्री शिव भजन करण्यात आले यावेळी गायक, राजू महाराज कुंचेली, शंकर महाराज डोनगांव, शिवाजी पाटील खुशाल राव तुपदाळे साहेब कुराडे, व्यंकटराव मारोती चौंडे,शुभम क्यादमपूरे



किनीकर नागनाथ स्वामी, सुभाष पाटील मुक्के, शिवानंद डोमगाव,शि भ प ज्ञानेश्वर बैस सर,मृदंग वादक, निळकंठ शेटकर, मारोती कापसे गंगाबाई स्वामी,हार्मोनियम वादक, व भजन मनोहर वनशेटे,राजू वसमते मोठ्या संख्येने उपस्थित होते आरती नंतर प्रसाद वाटप करण्यात आले व उपस्थित शिवभक्तांचे आभार वैजनाथ चौधरी यांनी मानले हानुमंत चंदनकर नांदेड

# पोलीस दूलाला मिळाली ऑटी ड्रोन गन

छ. संभाजीनगर ।प्रा संजय तुपे छत्रपती संभाजीनगर ग्रामीण पोलीस दलाला शुक्रवारी मिळालेली असून पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अप्पर अधीक्षक सुनील लांजेवार, यांच्या प्रमुख उपस्थितीत पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या मैदानावर या गंन ची चाचणीही घेण्यात आली. या गन मुळे वेरूळ, अजिंठा, पर्यटन स्थळे आणि व्हीआयपी व्यक्तींच्या दौऱ्या वेळी विनापरवाना ड्रोन आढळल्यास थेट हवेतून त्याला ताब्यात घेता येईल, दीड वर्षापासून ही गण मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू होते तत्कालीन पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया यांनी त्यासाठी प्रयत्न केले होते अखेरही गण ग्रामीण पोलिसांना मिळालेली आहे गण शिवाय एचडी स्पीकर असलेले सात ड्रोन कॅमेरे देखील मिळालेले आहेत संशयास्पद ड्रोन दिसून आले तर लगेच त्यांच्या सिग्नल यंत्रणेवर या अँटिड्रोन गनमुळे नियंत्रण मिळविता येणार आहे यातून संसद ड्रोन उतरवले जाऊ शकते किंवा जिथून ते उरले गेले तिथेही परत पाठवता येते यामुळे अपघाती



कारवाया संशयास्पद छत्रीकरण थांबवता येणार आहे हे इजरायली तंत्रज्ञान आहे या घनमुळे दीड किलोमीटर परिसरातील ब्लूटूथ इंटरनेट ही बंद पडते हे विशेष आहे या गन शिवाय मिळालेली सात अद्यावत ड्रोन ३६० अंश सेल्सिअस सेन्सर असलेले आहेत त्याला तीन लेन्स असून टेली फोटोची २५ मेगापिक्सल ४k व्हिडिओ साठी १२ मेगापिक्सल व थर्मल लेन्स ६४० पिक्सल ची आहे, थर्मल लेन्स द्वारे अंधारात देखील अष्टपरीकरण करता येईल या रेकॉर्डर असून ते ५ किलोमीटर पर्यंतच्या लोकांना वाईट प्रोसेस कार्य सूचना देऊ शकणार

# संततधार पावसाने ओलांडली जिल्ह्याची सरासरी
## २०२३ मध्ये याच दिनांकास होता केवळ ४७ टक्के पाऊस



बीड दि. 2 :- या वर्षाच्या जून ते ऑगस्ट महिन्या दरम्यान पावसाळी सरासरीने जिल्ह्याची 655.5 इतकी सरासरी गाठली असून वार्षिक सरासरीच्या 115 टक्के पावसाची नोंद पहिल्या तीन महिन्यात झाली आहे गतवर्षी हाच पाऊस या दिनांकास केवळ 47.7 टक्के इतका होता.

यंदाच्या हंगामात पाऊस चांगला राहील असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता त्यानुसार जिल्ह्यात सर्वच तालुक्यांमध्ये सरासरी ओलांडली गेली आहे व मुबलक प्रमाणात पावसाची नोंद सर्व ठिकाणी झाली आहे. जिल्ह्यात जून ते सप्टेंबर ची वार्षिक सरासरी 566.1 मिमी. इतकी असताना यंदा 1जून 2024 पासून आतापर्यंत 655. 5 मिलिमीटर सरासरी पावसाची नोंद झाली आहे.

तालुका निहाय झालेल्या पावसाची टक्केवारी खालील प्रमाणे आहे बीड जिल्हा एकूण सरासरी 566.1 मिलिमीटर प्रत्यक्ष झालेला पाऊस 655.5 मिलिमीटर.

बीड तालुक्यात जून ते सप्टेंबर सरासरी 594.5 प्रत्यक्षात झालेला पाऊस 664.2 मिलिमीटर टक्केवारी 111.9, पाटोदा तालुक्यात 538.7 प्रत्यक्षात झालेला पाऊस 747.9 टक्केवारी 138.8,आष्टी तालुक्यात 546.1 प्रत्यक्षात झालेला पाऊस 601.7 टक्केवारी 110.2,आष्टी तालुक्यात 546.1 प्रत्यक्षात झालेला पाऊस 601.7 टक्केवारी 1102,गेवराई तालुक्यात 587 प्रत्यक्षात झालेला पाऊस 660.8 टक्केवारी 112.6,माजलगाव तालुक्यात 616.9 प्रत्यक्ष झालेला पाऊस 6080 टक्केवारी 110.2,अंबाजोगाई तालुक्यात 632.4 प्रत्यक्षात झालेला पाऊस 698 टक्केवारी 110.4,केज तालुक्यात 583.6 प्रत्यक्षात झालेला पाऊस 612 टक्केवारी 104.9,परळी वैजनाथ तालुक्यात 628.1 प्रत्यक्षात झालेला पाऊस 657.9 टक्केवारी 104.7,धारूर तालुक्यात 669.8 प्रत्यक्षात झालेला पाऊस 685.4 टक्केवारी 102.3,वडवणी तालुक्यात 60.7 प्रत्यक्षात झालेला पाऊस 627.3 टक्केवारी 104.4,शिरूर का.तालुक्यात 515.6 प्रत्यक्षात झालेला पाऊस 632.6 टक्केवारी 122.7 आज सकाळी प्राप्त नोंदीनुसार गेल्या 24 तासात बीड जिल्ह्यामध्ये एकूण 61 महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झालेली आहे.

100 मिलिमीटर च्या वर एकूण 35 महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. सर्वात जास्त अतिवृष्टीची नोंद झालेले महसूल मंडळ,गेवराई तालुक्यातील रेवकी महसूल मंडळ 171.5mm,माजलगाव तालुक्यातील,गंगामसला महसूल मंडळ 171.0mm,परळी तालुक्यातील,सिरसाळा महसूल मंडळ 155.3 mm,धारुर तालुक्यातील,अंजनडोह महसूल मंडळ 108.8 mm,पैठण येथील जायकवाडी धरण 87 टक्क्याहून अधिक भरल्यानंतर यातून ताशी 500 दिवसात निसर्ग माजलगाव धरणासाठी सुरू करण्यात आलेला आहे. सदर पाणी जिल्ह्यात दाखल झाल्याचे शहागड येथील पुलावरून स्पष्ट निदर्शनास येत आहे.

बीड जिल्ह्यातील बिंदुसरा प्रकल्प देखील पूर्ण क्षमतेने भरला असून बीड शहरालगत बिंदुसरा नदी मधून दुथडी पाणी वाहताना दिसत आहे. पाण्याची आवक सुरू असल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी अशा सूचना जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्या आहेत.अनेक ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पाऊस थांबताच शेतीचे पंचनामे करण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी रविवारी जारी केले आहेत.

# आमदार प्रशांत बंब यांना उत्कृष्ट संसद पटू पुरस्कार



छ.संभाजीनगर । प्रा संजय तुपे राष्ट्रकुल संसद मंडळाच्या वतीने दिल्या जाणाऱ्या उत्कृष्ट संसद पटू पुरस्कारासाठी गंगापूर खुलताबादचे आमदार प्रशांत बंब यांची निवड करण्यात आली आहे राष्ट्रकुल संसद मंडळाच्या वतीने विधानसभा सदस्यांना उत्कृष्ट संसद पटू व उत्कृष्ट भाषण हे पुरस्कार दिले जातात आमदार यांना २०२१-२२ या वर्षासाठी उत्कृष्ट संसद पटू पुरस्कार मिळाला आहे विधानभवनात मंगळवारी दिनांक ३ सप्टेंबर दुपारी तीन वाजता होणाऱ्या विशेष कार्यक्रमात राष्ट्रपती द्रोपदी मुर्म यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे

# नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतक-यांनी वेळीच तक्रारी करण्याचे :जिल्हा कृषी विभागाचे आवाहन

बीड, दि.2 :- सध्या जिल्हयात सततचा पाऊस सुरू असल्यामुळे नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतकऱ्यांनी वेळीच तक्रारी कराव्यात, असे आवाहन करण्यात आलेले आहे. 'प्रधानमंत्री फसल बीमा योजना खरीप हंगाम २०२४' मध्ये 'भारतीय कृषी विमा कंपनी मार्यादित' यांच्यामार्फत बीड जिल्ह्यामध्ये राबविण्यात येत आहे.या अंतर्गत ज्या शेतकऱ्यांनी या काळामध्ये पिकांचे स्थानिक नैसर्गिक आपत्ती या बाबी अंतर्गत विमा संरक्षित क्षेत्र जलमय झाल्यास,भूस्खलन,गारपीट, ढगफुटी, महापूर, दीर्घ काळ पाणी साचून झालेले नुकसान व चक्रीवादळ, वीज पडून लागलेली नैसर्गिक आग इत्यादी कारणामुळे पिकाचे नुकसान झाले असल्यास. यासह ज्या पिकांची काढणीनंतर शेतात पसरवून अथवा पेंड्या बांधून सुकवणी करणे आवश्यक असते अश्या कापणी/काढणी नंतर सुकवणीसाठी शेतात पसरवून ठेवलेल्या अधिसूचित पिकांचे काढणीनंतर दोन आठवड्यांच्या आत(१४ दिवस) गारपीट,चक्रीवादळ, चक्रीवादळामुळे आलेला पाऊस आणि बिगर मोसमी पावसामुळे नुकसान झाले असल्यास खरीप हंगाम २०२४ मध्ये पिक विमा भरलेल्या शेतकरी बांधवांनी ७२ तासात पिक विमा कंपनीकडे ऑनलाइन तक्रार करावी. नुकसानग्रस्त पीक विमाधारक शेतकरी बांधवांनी वेळीच तक्रारी दाखल कराव्यात. पिक विमा कंपनीला तक्रार देण्यासाठी कृषी व शेतकरी कल्याण विभागामार्फत विकसित क्रॉप इन्शुरन्स अप्लिकेशन पुढील लिंक द्वारे गूगल प्ले स्टोर वरून डाऊनलोडकरून घ्यावे.

https://play.google.com/store/apps/details?id=in.farmguide.farmerapp.central या अप्लिकेशनचा वापर करून त्याद्वारे माहिती द्यावी. अधिक माहितीसाठी तालुका व जिल्हा कृषी कार्यालयातील खालील विमा प्रतिनिधी यांच्याशी संपर्क साधावा. असे आवाहन बीड जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, श्री सुभाष साळवे यांनी केले आहे. तसेच जर काही अडचण आल्यास कंपनीचा टोल फ्री क्रमांक १४४४७ असा असा ई-मेल पुढील प्रमाणे आहे. pikvima@aicofindia.com यावरही संपर्क करू शकता, असे ही सांगितले आहे.

तालुका प्रतिनिधी यांचे संपर्क क्रमांक खालीलप्रमाणे बीड तालुक्यात अविनाश सोनावणे (७०२०६२१७४७ ),पाटोदा तालुक्यात गोल्हार संपत (९७६४५५२२०३), आष्टी तालुक्यात लोंढे विनोद (९१४६८४०१०१), शिरूर कासार तालुक्यात विघ्ने गणेश (९७६७३५५९६९), माजलगाव तालुक्यात कुशेर आनंद (८३२९१३५७८९),गेवराई तालुक्यात चिकणे धनंजय (८४८२९१४४४४ ), धारूर तालुक्यात विशाल गायकवाड (७७०९८२६९२६ ), वडवणी तालुक्यात सावंत लहू (७३५०५०६३५५), अंबेजोगाई तालुक्यात पोटभरे नंदकुमार, (९४०३१८१४१४), केज तालुक्यात चौरे राहूल (८००७३३००२१), परळी तालुक्यात डापकर भागवत (९४०४८८६८८३ ), जिल्हा व्यवस्थापक इनकर बाबासाहेब (९८५०३१००५३ ) यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन जिल्हा कृषी विभागाने केले आहे.

# कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी साजरा केला जन्म गावी बैलपोळा सण

परळी वैद्यनाथ (दि.02) - महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आपले जन्मगाव नाथरा ता. परळी वै. येथे आज बैलपोळ्या निमित्त उपस्थित राहून आपल्या शेतातील बैल जोड्यांचे कुटुंबीयांसमवेत पारंपरिक पद्धतीने पूजन केले व बळीराजाचा जोडीदार असलेल्या बैल जोड्यांना पुरणपोळीचा नैवेद्य भरवला. बैलपोळ्याच्या निमित्ताने मराठवाड्यात बैलांची पूजा करताना पाऊस आल्याची चाहूल लागल्याचे एक खास गीत म्हटले जाते, "चाहुर चाहुर चांग भलं, पाऊस आला घरला चला" अशा आशयाचे हे ग्रामीण गीत बैलजोड्यांचे पूजन करताना स्वतः धनंजय मुंडे सुद्धा हे म्हणताना पाहायला मिळाले! देशाच्या समृद्ध कृषी परंपरेमध्ये बळीराजाच्या सोबतीने किंबहुना बळीराजाच्या बरोबरीने कष्ट उपसणाऱ्या बैलांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा बैलपोळा हा सण असून या निमित्ताने राज्यातील समस्त शेतकरी बांधवांना आपण शुभेच्छा देतो, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. या प्रसंगी धनंजय मुंडे यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई मुंडे, बंधू अजय मुंडे व अभय मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

नुकसानीचा घेतला आढावा

दरम्यान ग्रामीण भागात बैलपोळ्याचा सण उत्साहात साजरा केला जात असताना आपली पारंपारिक प्रथा जपत कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी आजच कृषी विभागाच्या दोन बैठकांनाही ऑनलाईन मार्गदर्शन केले. याशिवाय मागील दोन-तीन दिवसापासून बीड जिल्ह्यासह राज्यात मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, त्या नुकसानीचाही ऑनलाइन बैठकीत अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला, तसेच आवश्यक त्या ठिकाणी पावसाचा जोर कमी झाल्यानंतर पंचनामे करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. त्याचबरोबर मनुष्यहानी, पशुहानी होणार नाही, या पद्धतीने आपत्ती व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही संबंधित यंत्रणाना दिल्या आहेत.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077